आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०५ जानेवारी २०२५

ठळक बातम्या

1. भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा प्रधानमंत्र्यांना विश्वास / दिल्लीतल्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं केलं उद्घाटन आणि लोकार्पण.

2. प्रदेश भाजपाच्या विशेष सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात; नागपूरमध्ये भाजप सदस्यत्वाचा मुख्यमंत्र्याच्या हस्ते प्रारंभ.

3. सहकार क्षेत्रातील संस्थांसाठी विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सर्वांत मोठे भांडवल आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन.

4. महारेलने राज्यात बांधलेल्या 7 उड्डाणपुलांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपुरात होणार लोकार्पण.

पंतप्रधान नरेंद्र मोदी

भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजधानी दिल्लीत, रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याशी संबंधित, १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण झालं. त्यानिमित्तानं रोहिणी इथं झालेल्या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. येत्या २५ वर्षांत भारत विकसित देश झालेला आपण पाहू आणि दिल्लीला या विकसित देशाची राजधानी म्हणून अधिक विकसित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. दिल्ली-गाझियाबाद–मेरठ नमो भारत कॉरिडॉरच्या, तेरा किलोमीटर लांबीच्या विस्तारीत मार्गाचं उद्घाटन करून, त्यांनी दिल्लीला पहिल्या नमो भारत रेल्वे गाडीची भेट दिली.

सदस्य नोंदणी महाभियान

भारतीय जनता पक्षाकडून, संगठन पर्व सदस्य नोंदणी, महाभियान आज राज्यभर राबवल जात आहे. नागपुरात देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, रेशीमबाग इथल्या महात्मा फुले सभागृहात, सदस्यता नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी समाजातील २५ प्रतिष्ठित नागरिकांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदस्यत्व दिलं आणि नागपूर आणि राज्यातील भाजप सदस्यत्वा विषयी माहिती दिली......

*आज सकाळपासून शहराच्या प्रत्येक बूथमध्ये सदस्यता मोहीम सुरू झाली आणि सकाळपासून 25 हजार सदस्य आम्ही नोंदवले आहेत. आज सायंकाळपर्यंत एक लाख सदस्य आम्ही पूर्ण करू असं टार्गेट ठेवलेल आहे आणि राज्यामध्ये आमचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दीड कोटीच लक्ष ठेवलेलं आहे. सगळ्या बूथमध्ये महाराष्ट्रातल्या एक लाख बुथमध्ये आज आम्ही सदस्यता मोहिमेची सुरुवात केली आहे. मला विश्वास आहे की हा जो दीड कोटीचा आकडा आम्ही ठरवलेला आहे तो आम्ही निश्चित पूर्ण करू.*

महाराष्ट्रातील सगळयात मोठा पक्ष, भाजप आहे हे दाखवून दिलं मात्र हा आशीर्वाद, आपल्याला टिकवायचा असेल तर, लोकाभिमुख असणे गरजेचं असल्याचं त्यांनी सांगितलं.

*महाराष्ट्राच्या जनाजणाच्या मनामनातला पक्ष देखील भाजपच आहे हे भारतीय जनता पक्षाने दाखवून दिले. पण हा जो काही आशीर्वाद आपल्याला मिळालेला आहे हा आशीर्वाद जर आपल्याला टिकवायचा असेल तर आपल्या पक्षाची लोकाभिमुखता ही अत्यंत महत्वाची आहे. पक्षाची लोकाभिमुखता, संघटनेची लोकाभिमुखता आणि लोकप्रतिनिधींची लोकाभिमुखता या तिन्ही लोकाभिमुखतेच्या आधारावर आपण आपलं यश टिकवू शकू.*

यावेळी फडणवीस यांच्या हस्ते, ज्या कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी केली होती अशा कार्यकर्त्यांचा, सत्कार करण्यात आला.

वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा

नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचं संरक्षण करणं हा डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याच्या मसुद्याचा उद्देश आहे असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. नागरिकांच्या डिजिटल स्वरुपातल्या, वैयक्तिक तपशीलांची गोपनीयता कायम राखण्यासाठी कायद्याची चौकट मजबूत करण्याच्या हेतूनं ही नियमावली तयार करण्यात आली आहे. सर्व घटकातल्या भागधारकांच्या गरजा आणि जगभरातल्या सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे. याला कायद्याचं स्वरूप देण्यापूर्वी, नागरिकांनी या नियमावलीच्या मसुद्या विषयीचं आपलं अभिप्राय आणि सूचना, MyGov पोर्टलवर, १८ फेब्रुवारीपर्यंत सादर कराव्यात असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

गांधीबाग सहकारी बँक

एखादी संस्था बुडायला फार वेळ लागत नाही. पण संस्था उभी करण्यासाठी, लोकांमध्ये संस्थेप्रती विश्वास निर्माण करण्यासाठी अनेक वर्षे लागतात. सहकार क्षेत्रातील संस्थांसाठी तर, विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सर्वांत मोठे भांडवल आहे असं प्रतिपादन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या मानेवाडा इथं, गांधीबाग सहकारी बँकेच्या इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी केलं. महाराष्ट्राची सहकार क्षेत्राची परंपरा मोठी आहे. देशाला दिशा देण्याची क्षमता यात आहे. या क्षेत्रामध्ये प्रशिक्षणाची गरज अधोरेखित करतांना ते म्हणाले.

*येणाऱ्या काळामध्ये सहकार क्षेत्रामध्ये उत्तम काम करणारे नेते आणि कार्यकर्ते तयार करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे विदर्भात सहकार क्षेत्रात कर्मचार्यांकरता आणि संचालकांकरीता उत्तम ट्रेनिंगची आवश्यकता आणि उत्तम ट्रेनिंग जर मिळाला तर चांगलं नेतृत्व तयार होणार आहे आणि म्हणून डिसिजन मेकिंग कपॅसिटी असेल, टीमवर्क असेल, या सगळ्यामध्ये प्रशिक्षण खूप महत्वाचा आहे. आणि म्हणून अशा अनेक क्षेत्रात काम करणारे उत्तम कार्यकर्ते तयार करण्याकरता एक चांगली प्रशिक्षण संस्था सहकार क्षेत्रात असली पाहिजे.*

‘मी स्वतः काही काळ सहकार चळवळीत काम केलं. पण एकदा शेतकरी चळवळीचे नेते, शरद जोशी यांनी मला सहकार चळवळीतील नेतृत्वाचं महत्त्व समजावून सांगितलं होते. त्यांनी नेतृत्वाची विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची असल्याचं म्हटलं होते असं, गडकरींनी यावेळी नमुद केलं.

बाबासाहेब पाटील

राज्यात मोठी सहकार चळवळ, नव्यानं उभी करण्याची गरज असून, येत्या पाच वर्षात, नव्यानं दहा हजार सहकारी संस्था उभ्या करण्याचं धोरण शासनानं ठेवलं असल्याचं प्रतिपादन, राज्याचे सहकार मंत्री, बाबासाहेब पाटील यांनी केलं आहे. सोलापूरातील श्री सिध्देश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सव वर्षाच्या सांगता समारंभ प्रसंगी पाटील बोलत होते. सिध्देश्वर बँकेच्या वतीनं काढण्यात आलेल्या स्मरणिकेचं आणि मोबाईल बँकिंगचा शुभारंभ, पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कृषी आणि सहकार क्षेत्र हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. देशाची अर्थव्यवस्था शेती आणि शेतीपुरक व्यवसायाशीच निगडीत आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दुध व्यवसायातून धवल क्रांती निर्माण झाली होती. मात्र दूध संघाच्या चेअरमन मंडळींनी, काहीशी गल्लत केली त्यामुळ, सहकारी दुध संघ अडचणीत आल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आठवले पत्र परिषद

परभणीमध्ये संविधान स्तंभाचा अपमान झाल्यानंतर समाज घटकांच्या भावनाचा उद्रेक झाला होता. या घटनेचा निषेध करण्यासाठी, सोमनाथ सूर्यवंशी या कायद्याचं शिक्षण घेणाऱ्या तरुणाला, पोलिसांनी बेछुटपणे मारहाण केली आणि त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला. याचा तीव्र निषेध रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया करते असं सांगून आणि याची चौकशी विशेष पोलीस अधिकाऱ्यातर्फे करण्यात यावी अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री, रामदास आठवले यांनी आज, नागपूरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केली.....

*पोलिसांनी या संदर्भामध्ये काहीतरी ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे संविधानाचा अपमान झाल्यानंतर आपला उद्रेक आणि भावना व्यक्त केल्यानंतर तुम्ही त्याला एवढा बेछुट मारता, अशा पोलिसांना पोलीस खात्यातून काढून टाकलं पाहिजे अशा पद्धतीची आमची मागणी आहे आणि त्याची चौकशी मुख्यमंत्री देवेंद्रजींनी करावी आणि त्या प्रकरणांमध्ये शिक्षा झाली पाहिजे आणि त्या कुटुंबाला आर्थिक मदत देखील मिळाली पाहिजे त्यांच्या कुटुंबामध्ये जे दोन भाऊ आहे त्याच्यातील एकाला नोकरी मिळाली पाहिजे अशा पद्धतीची आमची मागणी आहे.*

यापुढील आयोजित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जर महायुतीनं योग्य स्थान दिलं नाही तर स्वबळावर लढू असं देखील त्यांनी स्पष्ट केलं. राज्य मंत्रिमंडळात एक जागा तसंच महामंडळातील अध्यक्षपद आपल्याला मिळावीत अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

महारेल

महारेलने राज्यात बांधलेल्या सात उड्डाणपुलांचे राज्यस्तरीय लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूरच्या .रामदासपेठेतील सेंट्रल बाजार रोडवरील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर होत आहे/. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील गोधनी, वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक, चंद्रपूरमधील बाबूपेठ रेल्वे फाटक, वाशीम रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक तसेच अमरावतीच्या चांदूर रेल्वेच्या रेल्वे फाटका वरील उड्डाणपूल या विदर्भातील 5 रेल्वे उड्डाणपूलांचा समावेश असुन जळगाव रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक आणी ,धुळयाच्या दोंडाईचा मधील रेल्वे फाटकावर उड्डाणपूल असे एकूण 7 पूल महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालयाचा संयुक्त उपक्रम असलेल्या महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेडने 373 कोटीच्या तरतुदीने बांधले आहेत.

## एनएसएच क्रिटिकल केअरम

नागपूरच्या गंगाबाई घाट चौक परिसरात भांगडिया फाऊंडेशनतर्फे उभारण्यात आलेल्या एन.एस.एच. क्रिटिकल केअर, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड डायग्नॉस्टिक सेंटरचं उद्घाटन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, आज झाले. एन.एस.एच. हे अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज असं रुग्णालय असून, याच्या उभारणीमुळ अनेक दुर्धर आजाराच्या रुग्णांना निश्चितच योग्य उपचार मिळतील असा विश्वास व्यक्त करून, फडणवीस यांनी संस्थेचे अध्यक्ष आणि सर्व पदाधिकाऱ्यांना, शुभेच्छा दिल्यात. मुख्यमंत्र्यांनी रुग्णालयातील अतिदक्षता कक्षाची यावेळी पाहणी केली आणि तिथल्या अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांबाबत तज्ज्ञांकडून माहिती घेतली. तसंच या रुग्णालयातील विविध कक्षांनाही त्यांनी भेट दिली.

## हवामान

महाराष्ट्रातून गायब झालेली थंडी पुन्हा एकदा परतली आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांनी, पुन्हा वेग धरला आहे. या वाऱ्यांच्या प्रवाहामुळ, महाराष्ट्र गारठला आहे. मुंबईसह राज्यातील इतर जिल्ह्यांमधील किमान तापमानाचा पारा, आणखी घसरला आहे. त्यामुळ राज्यात पुढील तीन दिवस थंडी कायम राहील असा अंदाज, हवामान विभागानं वर्तवला आहे.

******